दै. गोदातीर दि. 02/01/2023

# सागर यादव खून प्रकरण : आणखी तीन आरोपी 'स्थागुशा'च्या जाळ्यात

**नांदेड** – शहरातील सराफा लाईन इतवारा परीसरात दि. ६ नोव्हेंबर २०२३ रोजी रात्री ८ च्या सुमारास जुनागंज परिसरातील सागर यादव याचा खून झाला होता. या प्रकरणात आणखी तीन मारेकऱ्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गजाआड केले आहे.



इतवारा पोलीस ठाण्यात गुरनं. २४५/२०२३ कलम ३०२, ३०७, ३८४, ३८६, २९४, १४३, १४६, १४७, १४८, १४९, १२० (ब) भा. द. वि. सहकलम ४/२५ शस्त्र अधिनियमप्रमाणे गुन्हा दाखल असून या गुन्ह्यातील आरोपीचा शोध घेवून अटक करण्याबाबत पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना आदेशीत केले होते. त्यानुसार खंडेराय यांनी पथके तयार करुन आरोपीतांना अटक करण्याबाबत सुचना दिल्या होत्या.

पण आरोपी पुणे येथे असल्याचे कळताच वरिष्ठांची परवानगी घेवून स्थागुशाच्या पथकातील पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे यांना दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी पुण्याकडे रवाना करण्यात आले.

पथकाने चिंबळी (ता. खेड जि. पुणे) येथे स्थानिक पोलीसांची मदत घेवून आरोपी आकाश गोविंदराव लुळे (वय २१, रा. तानाजी नगर, नांदेड), दिपक अर्जुन पवार (वय २१, रा. शिवनगर, नांदेड), पप्पु शेषेराव गजलवाड (वय २०, रा. गोपाळनगर, नांदेड) यांना ताब्यात घेतले. त्यांची अधिक चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांना इतवारा पोलीस ठाण्याच्या स्वाधीन करण्यात आले आहे.

अटक करण्यात आलेले हे तिन्ही आरोपी विमानतळ ठाण्यातील गुरनं. ४२०/२०२३ कलम ३/२५, ७/२५ शस्त्र अधिनियम या गुन्हयात वाँटेड आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अपर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अपर पोलीस अधीक्षक (भोकर) खंडेराव धरणे अपर पोलीस अधीक्षक भोकर यांच्या मार्गदर्शनाखाल स्थागुशाचे पोलीस निरीक्ष उदय खंडेराय, पोउपनि दत्तात्र काळे, आशिष बोराटे, पोहे बालाजी तेलंग, पोकॉ विल कदम, विठ्ठल शेळके, ग धुमाळ, गजानन बयनव रणधीर राजबन्सी, तान येळगे स्थागुशा, नांदेड सायबर सेलचे पोहेका वि ओढणे, राजु सिटीकर पोलीस आयुक्तालय चिंचवड येथील पोउपनि रायकर व अमंलदार मो नदाब यांनी ही कामगिर पाडली.

दै. सत्यप्रभा

# सराफा भागातील खूनप्रकरणी आणखी तीन आरोपी गजाआड

**नांदेड, दि. १ :** जुन्या शहरातील सराफा बाजार भागात दीड महिन्यापूर्वी एकाचा खून करून फरार झालेल्या आणखी तीन आरोपींना गजाआड करण्याची कारवाई स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी पुणे येथून केली आहे.



सराफामधील सागर यादव (रा. जुना गंज, इतवारा) याचा काही जणांनी सहा नोव्हेंबर रोजी रात्री आठच्या सुमारास खून केला होता. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील फरार आरोपींचा शोध घेऊन अटक करण्याचे पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे आदेशित केले होते. त्यानुसार ३० डिसेंबर रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकातील पोउपनि दत्तात्रय काळे यांना मिळालेल्या माहितीनुसार आरोपी पुणे येथे असल्याचे समजले. त्यानंतर स्थागुशाच्या पथकाने चिंबळी (ता. खेड, जि. पुणे) येथे जावून स्थानिक पोलिसांच्या मदतीने सापळा रचून आरोपी आकाश गोविंदराव लुळे (वय २१, रा. तानाजी नगर, नांदेड), दीपक अर्जुन पवार (वय २१, रा. शिवनगर, नांदेड) आणि पप्पू शेषेराव गजलवाड (वय २०, रा. गोपाळनगर, नांदेड) >> पान दोनवर